# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक गा–हाणे निवारण मंच
# नागपुर शहर परिमंडळ, नागपुर.

---

## प्रकरण क्रं. ग्रागानिमं/नाशप/०५२ /२०१०

अर्जदार : श्री वसीम अहमद खान तर्फे बाबाभाई खान
राहणार प्लॉट नं. ८ रेल्वे स्टेशन रोड,
सिताबर्डी,
नागपुर.

– विरूध्द –

गैरअर्जदार : कार्यकारी अभियंता,
सिव्हील लाईन, नाशप,
म.रा.वि.वितरण कंपनी मर्या,
नागपुर.

गणपुर्ती : 1) श्रीमती के.के घरत
सदस्य–सचिव,
ग्राहक गा–हाणे निवारण मंच
नाशप, नागपुर.

2) श्रीमती गौरी चांद्रायण,
सदस्या
ग्राहक गा–हाणे निवारण मंच,
नाशप, नागपुर.

–– आदेश ––

पारीत दि. २०.०८.२०१०

ग्राहक गा–हाणे निवारण मंचात अर्जदार यांनी तक्रार अर्ज दिनांक ०७.०७.२०१० रोजी महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग (ग्रागानिम व विद्युत लोकपाल) विनियम २००६ कलम ६.४ प्रमाणे दाखल केलेला आहे.

अर्जदाराचा गा–हाण्याचा तपशील :–

१. श्री वसीम अहमद खान, रा. सिताबर्डी, अर्जदार यांनी सप्टेबंर २००९ पासुन येणा–या चुकीच्या विद्युत देयकाबद्दल माहे एप्रिल २०१० व जुन २०१० या महिन्यात  गैरअर्जदारास तक्रार दाखल केली होती. परंतु या तक्रारीवर गैरअर्जदाराने कुठलीही कार्यवाही न केल्यामुळे, अर्जदाराने मंचात दिनांक ०७.०७.२०१० रोजी गा–हाणे दाखल केले व विनंती केली की––

अ. उचित विद्युत देयक देण्यात यावे.

ब. चुकीच्या देयकामुळे झालेल्या मानसिक त्रासाबद्दल रू. ५०००/– भरपाई देण्यात यावी.

२. अर्जदार यांनी मंचात दाखल केलेल्या अर्जात असे नमुद केले आहे की एप्रिल २०१० मध्ये त्यांनी पहिल्यांदा गैरअर्जदारास तक्रार केली होती. त्यामध्ये असे नमुद केले होते की सदर विज जोडणी त्यांच्या दुकानावर असुन तिथे कुठलाही विजेचा वापर नाही. तरीही मीटर सदोष असलेला शेरा लावुन चुकीचे देयक देण्यात येत आहे. तेंव्हा योग्य ती दुरूस्तीकरून विद्युत देयक देण्यात यावे. परंतु सदर तक्रारीवर गैरअर्जदारातर्फे कुठलीही कार्यवाही न झाल्यामुळे माहे जुन २०१० मध्ये अर्जदाराने पुन्हा तक्रार अर्ज दाखल केला की त्यांना वापर नसतांना सुध्दा अवाजवी विद्युत देयक देण्यात येत आहे. तसेच विनंती करून सुध्दा संबंधीता कडुन विद्युत देयकाची दुरूस्ती होत नाही आणि विद्युत देयकाची रक्कम न भरल्यामुळे विद्युत पुरवठा खंडीत करण्याची धमकी दिली जात आहे. तेव्हा लवकरात लवकर विद्युत देयकात दुरूस्ती करून त्रासमुक्त करण्याची विनंती अर्जदाराने

गैरअर्जदाराला दिलेल्या पत्रात केली आहे. परंतु अर्जाचीही गैरअर्जदाराने कुठलीही दखल न घेतल्यामुळे अर्जदाराने मंचात गा—हाणे दाखल करून विनंती केली की योग्य विद्युत देयक देण्यात यावे आणि झालेल्या मानसिक व शारीरिक त्रासाकरीता रू. ५०००/— भरपाई देण्यात यावी. तसेच अर्जदारातर्फे भरण्यात आलेली अतिरिक्त रक्कम व्याजासहीत परत करण्यात यावी.

३. दिनांक २१.०७.२०१० रोजी गैरअर्जदाराने आपले उत्तर मंचात दाखल केले आहे. त्यामध्ये असे नमुद केले आहे की ग्राहक श्री वसीम अहमद खान, शॉप नं. ८, रेल्वे स्टेशन समोर यांचा ग्राहक क्रं. ४१००१६९४९८८८ आहे. सदर दुकानाला विज पुरवठा दिनांक १२.०८.२००९ रोजी देण्यात आलेला आहे. परंतु सदर दुकान रेल्वे ओव्हर ब्रिज खाली असल्यामुळे व त्याचा काही भाग कॉग्रेसनगर विभागात येत असल्यामुळे मीटरचे वाचन बरोबर झाले नाही. पुढे असे ही नमुद केले आहे की तपासणीत अर्जदाराचे दुकान बंद स्थितीत असुन तिथे विजेचा वापर होत नसल्याचे आढळले. तसेच अर्जदाराचा तक्रार अर्ज मिळाल्यानंतर, दिनांक ०१.०७.२०१० रोजी जुने मीटर सदोष असल्याचे समजुन मीटर बदलविण्यात आले व संप्टेबर २००९ पासुन आकारण्यात आलेले अतिरिक्त युनिट २४६४ रद्द करून माहे जुलै २०१० मध्ये समायोजीत करण्यात आले आहेत. तेव्हा ग्राहकाचा अर्ज दाखल केल्यानंतर कंपनीने त्वरीत विद्युत देयक दुरूस्त केले आहे. तेव्हा अर्जदारातर्फे करण्यात आलेली दंडात्मक कार्यवाहीची मागणी अयोग्य आहे व सदर तक्रार खारीज करण्याची विनंती गैरअर्जदाराने मंचात दाखल केलेल्या पत्रात केलेली आहे.

४. दिनांक २३.०७.२०१० रोजी मंचात सुनावणी घेण्यात आली. दोन्ही पक्ष उपस्थित होते. गैरअर्जदारातर्फे श्री कठाणे, सहाय्यक अभियंता

सिव्हील लाईन्स विभाग हे उपस्थित होते. श्री सुनिल जेकब, अर्जदार, प्रतिनिधी यांनी अर्जदाराची बाजु माडतांना सांगितले की गेल्या तीन चार महिन्यापासुन दुकान बंद असतांना सुध्दा गैरअर्जदारातर्फे अवाजवी विद्युत देयक पाठविण्यात येत आहे. तसेच देयक दुरूस्तीचे आश्वासन देवून सुध्दा देयकात योग्य ती दुरूस्ती करून देण्यात आली नाही. यामुळे अर्जदार दुःखी आहे. अर्जदार प्रतिनिधीने पुढे असेही सांगितले की अर्जदाराचा मृत्यु झाला आहे व त्यांच्या भावातर्फे सदर अर्ज दाखल करण्यात आला आहे. यावेळेस अर्जदारातर्फे दाखल केलेले कागदपत्र बघता मंचाचे असे लक्षात आले की अर्जदार मय्यत असुन सुध्दा प्रत्येक कागदावर अर्जदाराचे हस्ताक्षर आहेत. या विषयी अर्जदाराच्या प्रतिनिधीला विचारणा केली असता, अर्जदार प्रतिनिधीने मंचाला सांगितले की सर्व हस्ताक्षर अर्जदाराच्या पत्नीव्दारे करण्यात आले आहेत. परंतु सदर बाबी वर मंचाने आक्षेप घेतले की मय्यत अर्जदारातर्फे अर्जदाराच्या नावांने हस्ताक्षर करणे कायदेशिररित्या उचित नाही. तेव्हा ग्राहक प्रतिनिधीला तोंडी आदेश देण्यात आले की त्यांनी अर्जदाराच्या मृत्युचे प्रमाणपत्र व अर्जदाराच्या विज जोडणीचे वापर करणा—या व्यक्तीचे अधिकृत हस्ताक्षर मंचात दाखल करावे. तसेच मंचातर्फे ग्राहक प्रतिनिधीला भविष्यात मंचासमोर खोटया हस्ताक्षराचे कागदपत्र न सादर करण्याबाबत सक्त ताकीद देण्यात आली. अर्जदार प्रतिनिधीने आपली संमती दर्शविली व दोन दिवसात कागदपत्र सादर करण्याचे मान्य केले. तसेच मंचाला विनंती केली की सुनावणीची कार्यवाही पुढे सुरू ठेवण्यात यावी.

५. तेव्हा मंचाने वरील अटीवर कार्यवाही पुढे सुरू ठेवण्याची संमती दिली. त्यावेळेस अर्जदार प्रतिनिधीने मंचात आपले लिखीत बयान सादर केले, ज्यामध्ये असे नमुद केले आहे की कंपनीतर्फे कुणीही मीटर वाचनाकरीता येत नाही. तसेच मीटर सदोष दाखवून मीटर बदलविणे सुध्दा योग्य नाही. तसेच दुकान बंद असतांना सुध्दा ३०८ युनीट वापर

दाखवुन अवाजवी विद्युत देयके पाठविण्यात आले आहेत. जे अर्जदाराला मान्य नाही. तेव्हा ३०८ युनीटचे सर्व देयके रद्द करण्यात यावे. गैरअर्जदारातर्फे जे २४६४ युनीटचे देयके कमी करण्यात आलेले आहे, त्याची सविस्तर माहिती देण्यात यावी. तसेच ग्राहकाव्दारे भरलेली अतिरिक्त रक्कम रू.२१,८५०/— व्याजासोबत परत करण्यात यावी व फक्त वापरलेल्या ६१७ युनीटचे विद्युत देयक देण्यांत यावे. वरील सर्व बाबींचा विचार करून ग्राहकास न्याय देण्यात यावा.

६. गैरअर्जदाराने मंचासमोर स्पष्टीकरण दिले की अर्जदाराचे विद्युत देयक योग्य रितीने दुरूस्त करण्यात आले आहे व त्यामध्ये अर्जदारातर्फे भरणा केलेले अतिरिक्त रकमेचा सुध्दा समायोजन करण्यात आले आहे.

७. दिनांक 02.08.2010 रोजी अर्जदार प्रतिनिधीने नोटरीचे स्वाक्षरी असलेले मुद्रांक मंचात दाखल केले. या मध्ये अर्जदाराने प्रतिज्ञापत्र दिले आहे की अर्जदार प्रतिनिधीने चुकीने त्यांना मृत म्हटले आहेत. सद्यास्थितीमध्ये ते जिवीत आहे व त्यांच्या नावांने असलेल्या विद्युत पुरवठयाचा वापर त्यांचा भाऊ श्री बाबाखान करीत आहे. तसेच मंचात सादर केलेल्या सर्व कागदपत्रांवर त्यांचे स्वतःचे हस्ताक्षर आहेत.

वरील प्रतिज्ञापत्र वाचल्यानंतर मंचाने अर्जदार प्रतिनिधीला मंचात बोलवुन तोंडी आदेश दिले होते की अर्जदाराला प्रत्यक्षरित्या पुढील २ दिवसांत मंचासमोर हजर करावे. परंतु अर्जदार प्रतिनिधीने अर्जदाराला अद्यापपर्यंत मंचासमोर उपस्थित केले नाही व त्याबाबत मंचाला कुठलीही माहिती दिली नाही. अर्जदाराला मृत घोषित करणे, नंतर कागदोपत्री जिवीत करणे व अर्जदाराला मंचासमोर उपस्थित न करणे, या सर्व प्रकारामुळे मंचाचे असे मत आहे की अर्जदाराचा मंचात गा—हाणे दाखल करण्याच्या हेतु उपद्रवकारक, क्षुल्लक आणि दिशाभुल करणारा आहे. तेव्हा महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग

(ग्रागानिम व विद्युत लोकपाल) विनियम २००६, कलम ६.९ अनुसार "मंच, गा–हाणे कोणत्याही टप्प्यावर असताना नाकारेल जर गा–हाणे खालील प्रकारचे असल्याचे त्यास वाटले तर––

(१) क्षुल्लक, उपद्रवकारक, दुष्ट हेतुचे ;

(२) पुरेसे कारण नसलेले ;

(३) ग्राहकाला सकृत्‌दर्शनी कोणतीही हानी किंवा नुकसान किंवा गैरसोय झाली नसल्यास :

परंतु असे की, वरील उप–खंड (१), (२) व (३) च्या संदर्भात, अर्जदाराला त्याचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आली नाही तर कोणतेही गा–हाणे नाकारण्यात येणार नाही" म्हणुन सदर गा–हाणे खारीज करण्यात येत आहे.

## आदेश

सदर तक्रार महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग (ग्रागानिम व विद्युत लोकपाल) विनियम २००६, कलम ६.९ (१) अनुसार खारीज करण्यात येत आहे

| | |
|---|---|
| सही/– | सही/– |
| (श्रीमती के.के. घरत) | (श्रीमती गौरी चांद्रायण) |
| सदस्य – सचिव | सदस्या् |